RNI MAHMUL02805/2010/33481
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. IV, Jan. 2019 To June 2019


# नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास

**एस. एन. सातव**
समाजशास्त्र विभाग,
नागनाथ महाविद्यालय,
औंढा नागनाथ, जि. हिंगोली

**प्रा. डॉ. रामचंद्र मिसे**
संशोधन मार्गदर्शक
बिंदू[redacted] महाविद्यालय,
भोकर, जि. नांदेड

10 Research Paper - Sociology

प्रस्तुत परिच्छेदात संशोधकाने नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा सामाजिक स्थितीचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास दोन भागात प्रस्तुत करण्यात आला आहे.

१) नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक निकषानुसार वर्गीकरण.
२) नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे सामाजिक स्थितीनुसार वर्गीकरण.

याप्रमाणे दोन भागातील विश्लेषणात्मक अभ्यास येथे प्रस्तुत करण्यात आला आहे.

**नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे सामाजिक स्थितीनुसार वर्गीकरण.**

**१) लिंगानुसार वर्गीकरण :**

नगरपरिषदेत पुरुष आणि स्त्रिया दोन्हीही चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून काम करतात. नगर परिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात तो कर्मचारी पुरुष आहे किंवा स्त्री ही बाब महत्त्वाची ठरते. अनेक बाबी कर्मचारी पुरुष आहे की स्त्री यानुसार बदलतात. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे लिंगानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र..१**

**लिंगानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुरुष | ३४ | ५१.६७ | ४० | ६१.८२ | ४८ | ७३.७५ | १२२ | ६०.९७ |
| २. | स्त्री | ३१ | ४८.३३ | २५ | ३८.१८ | १७ | २६.२५ | ७३ | ३९.०३ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत: सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की, हिंगोली नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना

RNI MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. IV, Jan. 2019 To June 2019


चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी ३४ (५१.६७%) प्रतिसादक कर्मचारी पुरुष आहेत तर, ३१ (४८.३३%) प्रतिसादक कर्मचारी स्त्रिया आहेत.

**२)वैवाहिक स्थितीनुसार वर्गीकरण :**

वैवाहिक स्थिती म्हणजे प्रतिसादक विवाहित आहे की अविवाहित. वैवाहिक स्थितीनुसार व्यक्तिगत स्थिती भिन्न भिन्न बनते. विवाहित कर्मचाऱ्याला अविवाहित कर्मचाऱ्यापेक्षा जास्त कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे वैवाहिक स्थितीनुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. २**

**न्यादर्शाचे वैवाहिकस्थितीनुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विवाहित | ५० | ७७.५० | ५७ | ८८.१८ | ५८ | ८८.७५ | १६५ | ८४.१९ |
| २. | अविवाहित | १५ | २२.५० | ८ | ११.८२ | ७ | ११.२५ | ३० | १५.८१ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोतः सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की, हिंगोली नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी ५० (७७.५०%) प्रतिसादक कर्मचारी विवाहित आहेत तर, १५ (२२.५०%) प्रतिसादक कर्मचारी अविवाहित आहेत. कळमनुरी नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी ५७ (८८.१८%) प्रतिसादक कर्मचारी विवाहित आहेत तर, ८ (११.८२%) प्रतिसादक कर्मचारी अविवाहित आहेत.

**३) शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण :**

शैक्षणिक पात्रता/अर्हता ही नोकरी मिळविण्यासाठीची पहिली अट असते. नगरपरिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी देखील काही ना काही प्रमाणात शिकलेले असतातच. आजकाल शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार मोठ्या प्रमाणात झाला असल्यामुळे अनेकजण चांगले शिक्षित असल्याचे आढळून येते. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक निकषांनुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

RNI MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XIX, Vol. IV, Jan. 2019 To June 2019


सारणी क्र. ३

न्यादर्शाचे शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सातवीपर्यंत | ९ | १४.१७ | ८ | ११.८२ | ७ | ११.२५ | २५ | १२.५८ |
| २. | एसएससी पर्यंत | १७ | २५.८३ | १७ | २६.३६ | १५ | २२.५० | ४९ | २५.१६ |
| ३. | एचएससी पर्यंत | २८ | ४२.५० | ३१ | ४८.१८ | ३० | ४६.२५ | ८८ | ४५.४८ |
| ४. | पदवीपर्यंत | ९ | १४.१७ | ७ | १०.९१ | ९ | १३.७५ | २५ | १२.९० |
| ५. | पदव्युत्तर | २ | ३.३३ | २ | २.७३ | ४ | ६.२५ | ८ | ३.८७ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की, हिंगोली नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी ९ (१४.१७%) प्रतिसादक कर्मचारी सातवीपर्यंत शिकलेले आहेत तर, १७ (२५.८३%) प्रतिसादक कर्मचारी एस.एस.सी. पर्यंत शिकलेले आहेत. तसेच २८ (४२.५०%) प्रतिसादक कर्मचारी एच.एस.सी. पर्यंत शिकलेले आहेत, तर ९ (१४.१७%) प्रतिसादक कर्मचारी पदवी पर्यंत शिकलेले आहेत आणि २ (३.३३%) प्रतिसादक कर्मचारी पदव्युत्तर पर्यंत शिकलेले आहेत.

हिंगोली जिल्ह्यातील नगरपरिषदेतील एकूण १९५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी २५ (१२.५८%) प्रतिसादक कर्मचारी सातवीपर्यंत शिकलेले आहेत तर, ४९ (२५.१६%) प्रतिसादक कर्मचारी एस.एस.सी. पर्यंत शिकलेले आहेत. तसेच ८८ (४५.४८%) प्रतिसादक कर्मचारी एच.एस.सी. पर्यंत शिकलेले आहेत, तर २५ (१२.९०%) प्रतिसादक कर्मचारी पदवी पर्यंत शिकलेले आहेत आणि ८ (३.८७%) प्रतिसादक कर्मचारी पदव्युत्तर पर्यंत शिकलेले आहेत.

**४) संगणक प्रशिक्षणानुसार वर्गीकरण :**

आजचे युग हे संगणक युग आहे. आजकाल सर्वच क्षेत्रानध्ये संगणकीकरण झाले आहे. सर्व शासकीय कार्यालये देखील संगणकीकृत झाली आहेत. नगरपरिषदा देखील यास अपवाद नाहीत. संगणक प्रशिक्षण ही एक जमेची बाजू ठरू शकते. त्याचप्रमाणे बढतीच्या संधीचा विचार करता चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना संगणक प्रशिक्षण अधिक फायदेशीर ठरू शकते. संगणक प्रशिक्षण हे सहजपणे कोठेही घेता येण्यासारखे आहे. हे प्रशिक्षण फार खर्चिक देखील राहिले नाही.

RNI MAHMUL02805/2010/33461 Interlink Research Analysis IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377 Issue : XIX, Vol. IV, Jan. 2019 To June 2019


संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे संगणक प्रशिक्षणानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. ४**

**न्यादर्शाचे संगणक प्रशिक्षणानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मुळीच नाही | ४४ | ६७.५० | ४३ | ६६.३६ | ४३ | ६६.२५ | १३० | ६६.७७ |
| २. | कामापुरते | १५ | २२.५० | १८ | २८.१८ | १४ | २१.२५ | ४७ | २४.१९ |
| ३. | उत्तम | ७ | १०.०० | ४ | ५.४५ | ८ | १२.५० | १८ | ९.०३ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की, हिंगोली नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी ४४ (६७.५०%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांनी संगणक प्रशिक्षण झाले आहे काय यास 'मुळीच नाही' असा प्रतिसाद दिला आहे तर, १५ (२२.५०%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांनी संगणक प्रशिक्षण 'कामापुरते' झाले आहे असा प्रतिसाद दिला आहे आणि ७ (१०%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांनी हिंगोली जिल्ह्यातील नगरपरिषदेतील एकूण १९५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी १३० (६६.७७%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांनी संगणक प्रशिक्षण झाले आहे काय यास 'मुळीच नाही' असा प्रतिसाद दिला आहे तर, ४७ (२४.१९%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांनी संगणक प्रशिक्षण 'कामापुरते' झाले आहे असा प्रतिसाद दिला आहे आणि १८ (९.०३%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांनी संगणक प्रशिक्षण 'उत्तम' झाले आहे असा प्रतिसाद दिला आहे.

### ६) धर्मानुसार वर्गीकरण :

भारतात विविध धर्माचे लोक राहतात. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन अशा विविध धर्म आणि संप्रदायाचे लोक मिळून मिसळून या देशात राहतात. सर्वच धर्माचे लोक शासकीय तसेच सार्वजनिक क्षेत्रात काम करतात. नगरपरिषदेत देखील विविध धर्माचे लोक काम करत असतात. नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीच्या अभ्यासात धर्मानुसार वर्गीकरणाला महत्त्व आहे. कर्मचाऱ्यांचे धर्मानुसार वर्गीकरण करून त्यांचा सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जाऊ शकतो. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे धर्मानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

RNI MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XIX, Vol. IV, Jan. 2019 To June 2019


### सारणी क्र. ५
### धर्मानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हिंदू | १२ | १९.१७ | १४ | २१.८२ | १४ | २१.२५ | ४० | २०.६५ |
| २. | बौद्ध | २० | ३०.८३ | १९ | २९.०९ | २४ | ३६.२५ | ६२ | ३१.६१ |
| ३. | मुस्लिम | २१ | ३२.५० | २८ | ४२.७३ | २३ | ३५.०० | ७२ | ३६.७७ |
| ४. | ख्रिश्चन | ३ | ४.१७ | २ | २.७३ | २ | २.५० | ६ | ३.२३ |
| ५. | इतर | ९ | १३.३३ | २ | ३.६४ | ३ | ५.०० | १५ | ७.७४ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

**७) जातीच्या प्रवर्गानुसार वर्गीकरण :**

विविध जाती परंपरेचे लोक प्रत्येक धर्मात आहेत. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. विविध धर्म आणि संप्रदायांमध्ये अनेक जाती व उपजाती आहेत. त्याची विभागणी प्रवर्गामध्ये केली जाते. नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीच्या अभ्यासात जातीच्या प्रवर्गानुसार वर्गीकरणाला महत्त्व आहे. कर्मचाऱ्यांचे जातीच्या प्रवर्गानुसार वर्गीकरण करून त्यांचा सामाजिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जाऊ शकतो. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे जातीच्या प्रवर्गानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

### सारणी क्र. ६
### जातीच्या प्रवर्गानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | खुला | ५ | ७.५० | ४ | ६.३६ | ४ | ६.२५ | १३ | ६.७७ |
| २. | एस.सी. | ३१ | ४७.५० | २९ | ४४.५५ | २८ | ४३.७५ | ८९ | ४५.४८ |
| ३. | एस.टी. | १७ | २५.८३ | १४ | २०.९१ | १७ | २६.२५ | ४७ | २४.१९ |
| ४. | एन.टी. | ३ | ४.१७ | ११ | १७.२७ | ५ | ७.५० | १९ | ९.६८ |
| ५. | ओ.बी.सी. | १० | १५.०० | ७ | १०.९१ | ११ | १६.२५ | २७ | १३.८७ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

## ८) कुटुंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण :

एकत्र आणि विभक्त असे कुटुंबाचे दोन प्रकार पडतात. एकत्र कुटुंबाला संयुक्त कुटुंब असेही संबोधले जाते.नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्यांच्या कुटुंबाचा प्रकार अभ्यासणे महत्त्वाचे आहे. कुटुंबाचा प्रकार सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर परिणाम करणारा ठरतो. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे कुटुंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. ७**

**कुटुंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | एकत्र | ३७ | ५६.६७ | ४२ | ६४.५५ | ४० | ६१.२५ | ११८ | ६०.६५ |
| २. | विभक्त | २८ | ४३.३३ | २३ | ३५.४५ | २५ | ३८.७५ | ७७ | ३९.३५ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

## ११) नोकरीच्या कालावधीनुसार वर्गीकरण :

नोकरीचा कालावधी म्हणजे नगरपरिषदेत नोकरी लागल्यापासून तो आजपर्यंत किती वर्ष - महिने झाले आहेत हा कालावधी होय. नोकरीचा कालावधी त्या कर्मचाऱ्याची स्थिरता दर्शवितो. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात तो कर्मचारी किती वर्षांपासून नोकरी करतो ही बाब अभ्यासणे अत्यंत महत्त्वाची ठरते.

**सारणी क्र. ८**

**न्यादर्शाचे नोकरीच्या कालावधीनुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५ पेक्षा कमी | ९ | १३.३३ | ७ | १०.०० | ७ | ११.२५ | २३ | ११.६१ |
| २. | ५ ते १० | १३ | २०.०० | १२ | १९.०९ | ११ | १६.२५ | ३६ | १८.७१ |
| ३. | १० ते १५ | २९ | ४४.१७ | ३० | ४६.३६ | ३३ | ५१.२५ | ९१ | ४६.७७ |
| ४. | १५ ते २० | ८ | १२.५० | ९ | १२.७३ | ९ | १३.७५ | २५ | १२.९० |
| ५. | २० पेक्षा जास्त | ७ | १०.०० | ७ | ११.८२ | ५ | ७.५० | २० | १०.०० |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

RHL MAHMUL02905/2010/33451 IMPACT FACTOR (6.20) ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XIX, Vol. IV, Jan. 2019 To June 2019 59

हिंगोली जिल्ह्यातील नगरपरिषदेतील एकूण १९५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी २३ (११.६१%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा नोकरीचा कालावधी ५ वर्षापेक्षा कमी आहे. ३६ (१८.७१%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा नोकरीचा कालावधी ५ ते १० वर्षे आहे, ९१ (४६.७७%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा नोकरीचा कालावधी १० ते १५ वर्षे आहे तर, २५ (१२.९०%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा नोकरीचा कालावधी १५ ते २० वर्षे आहे आणि २० (१०%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचा नोकरीचा कालावधी २० वर्षापेक्षा जास्त आहे.

**नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे सामाजिक स्थितीनुसार वर्गीकरण.**

प्रस्तुत परिच्छेदात संशोधकाने नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे.

**१) घराच्या मालकीनुसार वर्गीकरण**

मानवाच्या मूलभूत गरजांपैकी अत्यंत महत्त्वाची अशी गरज म्हणजे घर होय. घराची मालकी त्या कुटुंबाच्या स्थिरतेचे द्योतक असते. त्याचप्रमाणे सामाजिक आणि आर्थिक उन्नतीचे हे एक प्रमाण देखील मानल्या जाते. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्या कर्मचाऱ्यांचा घराच्या मालकीनुसार अभ्यास महत्त्वाचा ठरतो. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे घराच्या मालकीनुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. ९**

**घराच्या मालकीनुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | होय | ३७ | ५७.५० | ३४ | ५२.७३ | ३७ | ५७.५० | १०९ | ५५.८१ |
| २. | नाही | २८ | ४२.५० | ३१ | ४७.२७ | २८ | ४२.५० | ८६ | ४४.१९ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

हिंगोली जिल्ह्यातील नगरपरिषदेतील एकूण १९५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी १०९ (५५.८१%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचे घर स्वतःच्या मालकीचे आहे. तर, ८६ (४४.१९%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांचे घर स्वतःच्या मालकीचे नाही.

**२) राहत्या घराच्या प्रकारानुसार वर्गीकरण**

घर हे कच्चे किंवा पक्के असू शकते. गारा, मातीचे घर, छतावर पत्रे असलेले घर हे कच्चे

RNI. MAHMUL02805/2010/33481
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. IV, Jan. 2019 To June 2019


घर मानले जाते तर सिमेंट कॉंक्रिटमध्ये बांधलेले आर.सी.सी. स्लॅबचे घर हे पक्के घर मानले जाते. घराचा प्रकार त्या घरमालकाच्या आर्थिक मजबूतीचे निदर्शक मानले जाते. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्या कर्मचाऱ्यांचा राहत्या घराच्या प्रकारानुसार अभ्यास महत्त्वाचा ठरतो. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे राहत्या घराच्या प्रकारानुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. .१०**

**राहत्या घराच्या प्रकारानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकुण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कच्चे | ४१ | ६३.३३ | ४८ | ७४.५५ | ५१ | ७८.७५ | १३९ | ७१.२९ |
| २. | पक्के | २४ | ३६.६७ | १७ | २५.४५ | १४ | २१.२५ | ५६ | २८.७१ |
| | एकुण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

**३) शौचालयाच्या उपलब्धीनुसार वर्गीकरण**

शौचालय ही एक अत्यंत आवश्यक अशी सुविधा आहे. उघड्यावर शौच करणे हे प्रकृतीसाठी हानीकारक तर असतेच कायद्यानेही ते चुकीचे आहे. सरकारतर्फे ज्यांच्याकडे शौचालय नाही त्यांना शौचालय बांधण्यास अर्थसहाय्य दिले जाते. शौचालय ही रोजच्याच उपयोगाची सोय असून ती प्रत्येक घरी असावयासच हवे. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्या कर्मचाऱ्यांचा शौचालयाची उपलब्धतेनुसार अभ्यास महत्त्वाचा ठरतो. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे शौचालयाची उपलब्धतेनुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

RNI. MAHMUL02805/2010/33481 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XIX, Vol. IV, Jan. 2019 To June 2019 61

सारणी क्र. ११

शौचालयाची उपलब्धतेनुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | होय | ५५ | ८४.१७ | ५७ | ८७.२७ | ५६ | ८६.२५ | १६७ | ८५.८१ |
| २. | नाही | १० | १५.८३ | ८ | १२.७३ | ९ | १३.७५ | २८ | १४.१९ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

हिंगोली नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी ५५ (८४.१७%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांकडे शौचालयाची उपलब्धता आहे. तर, १० (१५.८३%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांकडे शौचालयाची उपलब्धता नाही. कळमनुरी नगरपरिषदेतील एकूण ६५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी ५७ (८७.२७%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांकडे शौचालयाची उपलब्धता आहे.

५) वीज कनेक्शन उपलब्धीनुसार वर्गीकरण

वीजेचे कनेक्शन ही देखील एक दैनंदिन जीवनातील निकड बनली आहे. गृहोपयोगी अनेक उपकरणे वीजेवर चालतात त्याशिवाय रात्री प्रकाशाचा मुख्य स्त्रोत वीजेवरच अवलंबून आहे. करमणुकीच्या साधनांना देखील वीजेची आवश्यकता असतेच. त्यामुळे वीजेचे कनेक्शन घरोघर अनिवार्य बनले आहे. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्या कर्मचाऱ्यांचे वीज कनेक्शनच्या उपलब्धतेनुसार अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

सारणी क्र. १२

वीज कनेक्शनच्या उपलब्धतेनुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | होय | ६५ | ९५.८३ | ६१ | ९३.६४ | ६० | ९२.५० | १८४ | ९४.१९ |
| २. | नाही | ३ | ४.१७ | ४ | ६.३६ | ५ | ७.५० | ११ | ५.८१ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

RNI MAHMUL02805/2010/33481 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XIX, Vol. IV, Jan. 2019 To June 2019


हिंगोली जिल्ह्यातील नगरपरिषदेतील एकूण १९५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी १८४ (९४.१९%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांकडे वीज कनेक्शन उपलब्ध आहे. तर, ११ (५.८१%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांकडे वीज कनेक्शन उपलब्ध नाही.

**६) स्वयंपाकाचा गॅस उपलब्धीनुसार वर्गीकरण**

आज घरोघर स्वयंपाकासाठी गॅसचा वापर केला जातो. सरकारने देखील समाजातील सर्वच स्तरापर्यंत गॅस पोहोचविण्यासाठी विविध योजना आखलेल्या आहेत. समाजातील तळागातील लोकांपर्यंत गॅस पोहोचविण्यासाठी 'उज्ज्वला' ही केंद्रसरकारची योजना कार्यान्वीत आहे. या योजनेद्वारे लाखो घरांपर्यंत गॅस उपलब्ध झालेला आहे. नगरपरिषदेतील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीच्या अभ्यासात त्या कर्मचाऱ्यांचे स्वयंपाकाचा गॅसच्या उपलब्धतेनुसार अभ्यास महत्त्वाचा ठरतो. संशोधकाने नगर परिषदेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे स्वयंपाकाचा गॅसच्या उपलब्धतेनुसार वर्गीकरण अभ्यासले आहे. प्राप्त माहितीचे विवरण खालील सारणीत दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. १३**

**न्यादर्शाचे स्वयंपाकाचा गॅसच्या उपलब्धतेनुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकूण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | होय | ४४ | ६७.५० | ४१ | ६२.७३ | ५० | ७७.५० | १३३ | ६८.३९ |
| २. | नाही | २१ | ३२.५० | २४ | ३७.२७ | १५ | २२.५० | ६२ | ३१.६१ |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १९५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

हिंगोली जिल्ह्यातील नगरपरिषदेतील एकूण १९५ नमुना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांपैकी १३३ (६८.३९%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांकडे स्वयंपाकाचा गॅस उपलब्ध आहे. तर, ६२ (३१.६१%) प्रतिसादक कर्मचाऱ्यांकडे स्वयंपाकाचा गॅस उपलब्ध नाही.

**१०) टी.व्ही. उपलब्धीनुसार वर्गीकरण**

करमणुकीचे महत्त्व लक्षात घेता आज बाजारात करमणुकीची अनेक साधने उपलब्ध आहेत. यातील काही साधने काळाच्या ओघात मागे पडली असली तरीही टी.व्ही.ने आपले स्थान अधिक घट्ट केले आहे. टी.व्ही. हे करमणुकीचे आजपर्यंतचे सर्वात लोकप्रिय साधन आहे. समाजातील

RNI MAHMUL02805/2010/33481 IMPACT-FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XIX, Vol. IV, Jan. 2019 To June 2019 63

सर्वच स्तरांमध्ये टी.व्ही.ची लोकप्रियता पहावयास मिळते.

**सारणी क्र. १४**

**टी.व्ही.च्या उपलब्धतेनुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | विवरण | हिंगोली | % | कळमनुरी | % | वसमत | % | एकुण | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | होय | ४४ | ६७.५० | ४५ | ६९.०९ | ५६ | ८६.२५ | १४२ | ७२.९० |
| २. | नाही | २१ | ३२.५० | २० | ३०.९१ | ९ | १३.७५ | ५३ | २७.१० |
| | एकूण | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | ६५ | १००.०० | १६५ | १००.०० |

स्रोत : सर्वेक्षण.

## संदर्भ सूची :-


१) दत्त अभिजित (१९७२), 'द निड ऑफ म्युनिसिपल ट्रेनिंग इन इंडिया', जरनल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन ओव्हरसिज, ११:३, पृ. १६२.

२) भट्टाचार्य मोहित (१९७४), यांनी आपल्या, 'मोटीव्हेटींग म्युनिसिपल एम्प्लॉईज', नागरलोक, ६:४, पृ. ४६ ते ५५.

३) ओल्डनबर्ग फिलिप के. (१९७४), 'बिग सिटी गव्हर्नमेंट इन इंडिया', नागरलोक. ६:३, पृ. ५ ते १०.

४) देव राज (१९७४), 'द रिलेशनशिप बीटविन लेबर लॉज् ॲंड म्युनिसिपल पर्सोनेल', इंडियन जरनल ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, १९:३, पृ. ३३८ ते ३४९.

५) व्यंकटेश्वरा राव डी. (१९७४), 'म्युनिसिपल पर्सोनेल सिस्टीम इन आंध्रप्रदेश', नागरलोक, ६:४, पृ. ५९ ते ६३.

६) रे केइथ (१९७६), यांनी त्यांच्या, 'ए मॉडेल फॉर द प्रमोशन ऑफ प्रोफेशनल ॲंड ॲडमिनिस्ट्रेटीव्ह स्टाफ इन अ लोकल ॲथॉरिटी', लोकल गव्हर्नमेंट स्टडीज, २:४, पृ. ३९ ते ५०.

७) के. वेंकटरामन (१९६८), 'क्रिएशन ऑफ अ कॅडर ऑफ लोकल सिव्हील सर्विस परसोनेल', लोकल गव्हर्नमेंट, इंडियन इन्स्टिटयुट ऑफ पब्लिक ॲडमिनीस्ट्रेशन, खंड १४, अंक ३, पृ. १६३.

८) बंग आर के. (२०००), कर्मचारीवर्ग प्रशासन आणि वित्तीय प्रशासन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.